-93-

# जिल्हाधिकारी, रत्नागिरी

मोटार-कार, वैयक्तिक संगणक, मोटार-सायकल, स्कूटर, मोपेड, तीन चाकी स्वयंचलीत सायकल व दुचाकी सायकल खरेदी करण्यासाठी दिल्या जाणा-या अग्रिमावर आकारावयाचा व्याजाचा दर.

सन 1998-99.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक:अग्रिम (व्याज-दर)-1098/प्र.क्र.26/98/विनियम,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक:- 15 जुलै, 1998.

**शासन निर्णय**:- मोटार-कार, वैयक्तिक संगणक, मोटार-सायकल, स्कूटर, मोपेड, तीन चाकी स्वयंचलीत सायकल व दुचाकी सायकल खरेदी करण्यासाठी शासकीय कर्मचा-यांना/अधिका-यांना दिनांक 1 एप्रिल, 1998 ते 31 मार्च, 1999 या कालावधीत देण्यात आलेल्या/येणा-या अग्रिमावर शासनाने व्याजाचा वार्षिक दर खाली दर्शविल्याप्रमाणे निश्चित केला आहे.

| वर्ष | मोटार-कार करिता | वैयक्तिक संगणका-करिता (दिनांक 1 एप्रिल, 1998 ते 30 जून 1998 पर्यंत.) | मोटार-सायकल, स्कूटर, मोपेड, तीन चाकी स्वयंचलीत सायकल करीता | दुचाकी सायकल |
|---|---|---|---|---|
| दिनांक 1 एप्रिल, 1998 ते 31 मार्च, 1999. | 15% | 15% | 11.5% | 9% |

2. वैयक्तिक संगणक खरेदी अग्रिम हे शासन पूरकपत्र क्र.अग्रिम-1098/प्र.क्र.16/98/विनियम, दि.17 जून, 1998 अन्वये दि.1 जुलै, 1998 पासून "व्याजरहित" अग्रिम करण्यात आले आहे. तसेच ज्या शासकीय अधिका-यांनी यापूर्वी संगणक अग्रिम घेतलेला आहे, परंतु दिनांक 30 जून, 1998 पर्यंत त्यावरील व्याजाच्या वसुलीस नियमांनुसार सुरुवात झालेली नाही त्या सर्व अग्रिम धारकांना व्याज माफ करण्यात आलेले आहे. मात्र, ज्या शासकीय अधिका-यांचे दिनांक 30 जून, 1998 पर्यंत देय असलेले व्याज वसूल करण्यात आले आहे, त्यांना दिनांक 1 जुलै, 1998 पासून पुढील व्याज माफ करण्यात आलेले आहे.

३. दिनांक 1 एप्रिल, 1998 ते 30 जून, 1998 पर्यंत "वैयक्तिक संगणक" खरेदी अग्रिमावरील व्याजाचा दर द.सा.द.शे. 15 निश्चित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वर्षा अ. नाईक,
शासनाच्या उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-1, महाराष्ट्र, मुंबई-400 020,